झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स-II, सेनापती बापट रोड, पुणे -१६
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-१/१२२८/२०२५
दिनांक :-१८/०८/२०२५.

## "जाहीर नोटीस"

### (झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पूर्वसूचना)

प्रस्तावना-

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे सोयीकरीता **"उपरोक्त अधिनियम"** असा करणेत येत आहे) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरीता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र.झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/झो.प.सु-१ दि.३०/०६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे. आणि;

२) ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजूरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. आणि;

३) ज्याअर्थी, उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याचे या कार्यालयाचे नियोजन आहे. आणि;

४) ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेली मिळकत ही महानगरपालिकेकडून अधिनियमाच्या कलम ४ अंतर्गत झोपडपट्टी म्हणून घोषित नसल्याने मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचे दि.२८/०५/२०२५ रोजीच्या मान्यतेने उप आयुक्त, परिमंडळ क्र.५, पुणे महानगरपालिका पुणे यांनी त्यांचेकडील पत्र क्र.१४९७, दि.१६/०५/२०२५ अन्वये सदर ठिकाणी झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असलेबाबतचा अहवाल सादर केला असून मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, पुणे यांनी सक्षम प्राधिकारी क्र.१ झोपुप्रा, पुणे यांचे समवेत दि.२१/०२/२०२५ रोजी स्थळपाहणी करून झोपडपट्टी स्थितीची खात्री केली आहे व त्याबाबत स्वतंत्र अहवाल सादर केला आहे. आणि,

५) ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीचे त्रिमितीय पद्धतीने केलेल्या परिगणनेनुसार ५८७६.७१ चौ.मी. इतके क्षेत्र झोपडपट्टीने व्याप्त आहे, असे उप अधिक्षक भूमि अभिलेख, झोपुप्रा, पुणे यांनी दि.२७/०५/२०२५ रोजीच्या अहवालाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे सदर योजनेकरीता ५८७६.७१ चौ.मी इतके क्षेत्र विचारात घेण्यात येत आहे. आणि;

६) ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीचा शासकीय मोजणी नकाशा सादर झालेनंतर त्यानुसार येणारे योजनेचे क्षेत्र व चतु:सिमा अंतिम राहतील. आणि;

७) ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (सुधारणा), २०१७ मधील तरतूदी विचारात घेता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करताना *"कोणतीही झोपडपट्टी योजना प्रसिद्ध झाल्यानंतर यथाशिघ्र, मुख्य कार्यकारी अधिकारी, कोणत्याही जमीनीच्या बाबतीत मग ती पूर्वी झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित झालेली असो किंवा नसो व ज्या सामुहिक आर्थिक कार्यक्षेत्राचा अंतर्भाव करता येईल ती जमीन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्याची खात्री पटल्यावर कोणतीही सार्वजनिक प्राधिकरणे किंवा राज्य विधी मंडळाने अधिनियम केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये गठीत केलेल्या राज्य शासनाच्या स्थानिकसंस्था यांसह जमीन मालकांना ३० दिवसांची नोटिस आणि त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे आणि त्यानंतर ४५ दिवसाच्या आत अशी जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करील"*, असे नमूद केले आहे. आणि;

८) ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारित अधिनियम २०१७) चे कलम ३(क) नुसार 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषित करणेकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, पुणे हे सक्षम आहेत. आणि;

९) ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद क्षेत्रावर झोपडपट्टी असलेने सदरचे क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) च्या तरतुदीनुसार खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेबाबत खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

आदेश :-

(१) खालील अनुसूचीमध्ये नमूद क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) नुसार "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून घोषित करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

(२) अनुसूचीमध्ये निर्दिष्ट क्षेत्राचे जमीन मालक अथवा मालकी हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती/संस्था यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत लेखी स्वरूपात उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.१, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांच्याकडे सादर करण्यास फर्मविण्यात येत आहे. अशा सूचना व हरकती विचारात घेऊन या प्रकरणी ४५ दिवसांचे आत हे क्षेत्र उक्त कलमाखाली "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून घोषित करण्याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे मार्फत घेण्यात येईल.

## अनुसूची

झोपडपट्टीचे नाव :- फा.प्लॉट क्र.५०९पै, आंबेडकर वसाहत, पर्वती, टी.पी.स्कीम-०३, पुणे
महानगरपालिका क्षेत्र :- पुणे महानगरपालिका.

| गाव- आंबेडकर वसाहत, पर्वती | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| स.नं./ सि.स.नं./ फा.प्लॉ.क्र | जमीन/ भोगवटदाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) (त्रिमितीय पध्दतीने) | योजनाक्षेत्राची चतु:सिमा | | | |
| | | | पूर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| फा.प्लॉट क्र.५०९पै | गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र रेव्हेन्यु डिपार्टमेंट | ५८७६.७१ चौ.मी. | अंबिल ओढा | रस्ता व श्री गजानन महाराज मठ | फा.प्लॉ.क्र. ५१२ पै व ५१२ अ पै | फा.प्लॉ.क्र.५०८ पै |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :- १८/०६/२०२५

(नीलेश र. गटणे) (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

सर्वेक्षक   ना. तहसिलदार   तहसिलदार   सक्षम प्राधिकारी क्र. १

प्रत-

१. मा.जिल्हाधिकारी, पुणे (महसूल शाखा)- यांसकडे माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव सादर.
२. मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका - यांना माहितीस्तव सादर.
३. संगणक अधिकारी, झोपुप्रा, पुणे- झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावा.